# गुलजार



गुलजार यांना किती पुरस्कार मिळाले आहेत पाहूया -

('स्लमडॉग मिल्यनेअर' साठी ऑस्कर हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळण्याआधीचा हा लेख आहे.)

तीन राष्ट्रीय पुरस्कार - 'मौसम' साठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, 'कोशिश' साठी उत्तम पटकथा-संवाद आणि 'इजाजत' ('मेरा कुछ सामान') साठी सर्वोत्कृष्ट गीतकार म्हणून.

आता फिल्मफेअर अवॉड्‌र्स पाहूया -

सर्वोत्कृष्ट गीतलेखक -

'दो दिवाने शहर मे' - 'घरोंदा' (१९७७)

'आनेवाला पल जानेवाला है' - 'गोलमाल' (१९७९)

'हजार राहे मुडके देखी' - 'थोडीसी बेवफाई' (१९८०)

'तुझसे नाराज नही जिंदगी' - 'मासूम' (१९८३)

'मेरा कुछ सामान' - 'इजाजत' (१९८८)

'यारा सीली सीली' - 'लेकिन' (१९९१)

'चल छैय्या छैय्या' - 'दिल से' (१९९८)

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - मौसम

सर्वोत्कृष्ट संवादलेखक - 'आनंद', 'नमकहराम', 'माचिस'

सर्वोत्कृष्ट कथा - 'माचिस'

सर्वोत्कृष्ट चित्रपट (समीक्षक) - 'ऑंधी'

सर्वोत्कृष्ट माहितीपट - 'अमजद अली खान'

हे फक्त राष्ट्रीय आणि फिल्मफेअर पुरस्कार आहेत. ह्याखेरीज अन्य कितीतरी पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. आणि कित्येक अवॉर्ड्स त्यांना आज ना उद्या मिळतीलच. कारण गुलजार हे अजूनही उत्तम प्रकारे गीतलेखन, कथालेखन, निर्मिती आणि दिग्दर्शन करतच आहेत.

आता पाकिस्तानात असलेल्या दीना येथे १८ ऑगस्ट १९३४ रोजी गुलजार यांचा जन्म झाला. त्यांचं मूळ नाव संपूर्णसिंग असं होतं. देशाच्या फाळणीच्या काळात गुलजार यांचे कुटुंबिय खडतर प्रसंगांतून होरपळून निघाले आणि ते सर्व अमृतसरला निघून आले. गुलजार यांनी कायमच उत्तम प्रतीच्या आयुष्याची स्वप्नं पाहिली होती आणि तीच त्यांना मुंबईला घेऊन आली. प्रथम वरळी येथे त्यांनी गॅरेज मेकॅनिक म्हणून काम केलं. परंतु तिथेदेखील त्यांनी काव्याची आवड जोपासली. तरुणपणी गीतकार शैलेंद्र हे त्यांचे आदर्श होते. एखाद्या साध्या सरळ प्रसंगासाठी लिहिलेल्या साध्या पण सुबोध शब्दरचनेला वाङ्मयाच्या पातळीवर पोचविण्याचं सामर्थ्य शैलेंद्र यांच्या लेखणीत होतं असं गुलजार यांचं मत आहे. शैलेन्द्रंच्या अशा काव्यांनी ते भारून जात - 'चिठिया हो तो हर कोई बाटे, भाग ना बाटे कोई', 'बलमवा बैरी हो गये हमार'. साहिरबद्दलही त्यांना खूप आदर होता. गुलजार साहिर्बद्दल म्हणत, "गाण्यांतून प्रणयरम्य प्रतिमा डोळ्यांसमोर उभी करण्यात ते माहिर होते. 'जाल' मधील 'ये रात ये चाँदनी फिर कहा' ह्या गाण्यातील 'पेडोंकी शाखोंपे सोयी सोयी चाँदनी' ही ओळच पहा ना.."

बिमल रॉय यांच्या 'बंदिनी' मध्ये त्यांनी शिकाऊ उमेदवार म्हणून कामास सुरुवात केली. तेव्हा ते २८ वर्षांचे होते. त्यानंतर त्यांनी 'आनंद', 'मिली' वगैरे कित्येक चित्रपटांत हृषिकेश मुखर्जी यांचे सहाय्यक म्हणून काम केलं. दरम्यान शैलेन्द्र यांनी त्यांना 'बंदिनी' साठी एक गाणं लिहिण्यास सुचविलं आणि अशा रितीने त्यांनी गीतलेखनाचीही सुरुवात केली. एस्. डी. बर्मन यांनी चाल दिलेलं आणि लताने गायलेलं 'मोरा गोरा अंग लई ले, मोहे शाम रंग दई दे' हेच ते गाणं. त्यानंतर १९६० च्या दशकात गुलजार यांनी 'काबुलीवाला', 'सन्नाटा', 'दो दुनी चार', 'बिवी और मकान' आणि 'खामोशी' अशा कित्येक चित्रपटांसाठी भरपूर गाणी लिहिली. १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मेरे अपने' या चित्रपटाद्वारे ते दिग्दर्शक म्हणून लोकांसमोर आले. या चित्रपटात मीनाकुमारी यांची मुख्य भूमिका होती आणि त्या दरम्यान तिची गुलजार यांच्याशी ओळख आणि मैत्री झाली. मीनाकुमारी ही एक उत्कृष्ट अभिनेत्री तर होतीच, पण ती कवियत्रीही होती. गुलजार आणि तिच्यात एवढी जवळीक निर्माण झाली होती की मृत्यूपूर्वी तिने आपल्या सगळ्या कविता गुलजार यांच्याकडे सोपवल्या होत्या. पुढे गुलजारनी 'मीनाकुमारीकी शायरी' या नावाने तो कवितासंग्रह प्रसिध्द केला.

मीनाकुमारीच्या मृत्यूनंतर जवळजवळ २५ वर्षांनी 'टाईम्स ऑफ इंडिया' मधील एका लेखात गुलजार

यांनी असं लिहिलं आहे की "मीनाकुमारीनेच मला लेखनाकडे वळवलं. तिने मला भरपूर प्रोत्साहन दिलं. खरं तर तिनेच मला सतार वाजवण्यापासून परावृत्त केलं. मी जर सतार वाजवण्यात वेळ घालवला तर लेखनावरील माझं लक्ष विचलित होईल आणि ओघळलेल्या मोत्यासारखी माझी अवस्था होईल. म्हणूनच 'जान मे' हा माझा पहिलाच ५० कवितांचा संग्रह मी तिला अर्पण केला आहे."

गीतलेखनाखेरीज गुलजार यांनी बर्‍याच चित्रपटांच्या कथाही लिहिल्या. जवळ जवळ ६० चित्रपटांच्या कथा त्यांच्या नावावर आहेत. त्यांनी १७ चित्रपटांचं दिग्दर्शनही केलं. १९८७च्या सुमारास जवळ जवळ १० वर्षं काही कारणास्तव चित्रपटसृष्टीतून ते गायबच झाले. परंतु ह्या वेळात त्यांनी नसिरुद्दिन शहाला घेऊन 'मिर्झा गालिब' नावाची एक सुंदर मालिका दूरदर्शनसाठी तयार केली. त्यामधील काही गाणी अतिसुंदर होती.

त्यानंतर चित्रपटसृष्टीत पुनरागमन केल्यावर त्यांनी पंजाबातील दहशतवादावर आधारित 'माचिस' हा चित्रपट केला. आता पुन्हा ते चित्रपटांत गीतलेखन करू लागले. तसंच चित्रपटांव्यतिरिक्तही ते काव्यलेखन करू लागले. 'रुदाली', 'सदमा', 'मारासिम', 'फिजा', 'हुतूतू' इ. चित्रपटांतील त्यांची गाणी तुम्हाला आठवत असतीलच.

गुलजार लहान मुलांसाठी सदैव काही ना काही करत असतात. त्यांनी दहा गाण्यांचा एक आल्बम तयार केला आहे. त्यात त्यांनी समालोचन केलेलं आहे. तर गाणी मन्ना डे, भूपिंदर आणि इतरांनी गायलेली आहेत. ह्या आल्बमचं नाव होतं 'बंदर बिन्धास्त बंदर'. तसंच त्यांनी 'कैद' नावाचं पुस्तकही प्रकाशित केलं आहे. त्याची संपूर्ण संकल्पना त्यांची स्वत:ची आहे, तर भोपाळमधील काही अपंग मुलांनी काढलेली चित्रं त्याच्यात आहेत. तसं पाहिलं तर त्यांनी मुलांसाठी कित्येक छोट्या छोट्या गोष्टी लिहिल्या. तसंच नॅशनल चिल्ड्रन्स फिल्म ट्रस्टच्या विविध उपक्रमांवर त्यांनी काम केलं आहे.

सदैव कामात व्यस्त असणार्‍या ह्या लेखकाने लिहिलेल्या कित्येक लघुकथा प्रसिध्द झाल्या आहेत. 'रावी पार आणि इतर कथा' हा त्यांचा लघुकथासंग्रह त्यांनी आपली पूर्व पत्नी राखी हिला अर्पण केला आहे. त्यांनी तिचा उल्लेख 'माझ्या जीवनातील दूरगामी लघुकथा' असा केला आहे. 'त्रिवेणी' हा त्यांचा आणखी एक काव्यसंग्रह हार्पर कॉलिन्स यांनी प्रसिध्द केला आहे. ह्यामध्ये 'शेर' हा प्रचलित दोन ओळींऐवजी तीन ओळींत आहे. त्यांनी 'साँस', 'पल छिन' आणि 'सिस्की' ह्या दूरदर्शन मालिकांसाठी जगजित सिंग यांच्याकरता शीर्षक गाणी तयार करून दिली आहेत.

त्यांचा आल्बम 'वादा' मध्ये त्यांच काव्य व प्रख्यात सरोदवादक उस्ताद अमजद अली खान यांचं संगीत यांचा सुरेख मिलाप आहे. ही गाणी रुपकुमार राठोड व साधना सरगम यांनी गायली आहेत. गुलजार

यांनी गझल व इतर काव्यरचनांचेदेखील अनेक आल्बम काढले आहेत.

आर. डी. बर्मन संगीत देत असलेल्या कित्येक चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केलं होतं. 'परिचय', 'आँधी', 'घर', 'किनारा', 'गोलमाल', 'बसेरा', 'मासूम', 'इजाजत' इ. इ. असे ते चित्रपट आहेत. त्यांनी भूपिंदरसाठीही बरीच गाणी लिहिली. ती कुठली ते हिंदी चित्रपटगीतांच्या पुढील यादीतून तुम्ही शोधून काढू शकता.

| Song | Singer | Film |
|---|---|---|
| Mora gora ang layee le | Lata | Bandini |
| Ganga aaye kahaan se | Hemant | Kabuliwala |
| Saawan ki raaton mein | Talat & Lata | Prem Patra |
| Jaane kahaan dekha hai | Rafi | Biwi Aur Makaan |
| Hawaaon pe likh do | Kishore | Do Dooni Chaar |
| Tumhaare nayan dekh ke | Hemant | Raahgeer |
| Tum pukaar lo | Hemant | Khamoshi |
| Humne dekhi hai | Lata | Khamoshi |
| Woh shaam kuchh ajeeb thi | Kishore | Khamoshi |
| Bas ek chup si lagi hai | Hemant/Lata | Sannata |
| Ik tha bachpan | Lata | Ashirwad |
| Jhir jhir barse | Lata | Ashirwad |
| Humko man ki shakti dena | Vani Jairam, chorus | Guddi |
| Bole re papihara | Vani Jairam | Guddi |
| Koi hota jisko apna | Kishore | Mere Apne |
| Jab bhi yeh dil udaas hota hai | Rafi & Sharda | Seema |
| Musafir hoon yaaro | Kishore | Parichay |
| Beeti na bitaye raena | Bhupinder & Lata | Parichay |
| Saare ke saare | Kishore & Asha | Parichay |
| Mitwa, bole meethe bol | Bhupinder, Lata | Parichay |
| Maine tere liye hi saat rang ke | Mukesh | Anand |
| Na, jiya laage na | Lata | Anand |
| Mujhe jaan na kaho meri jaan | Geeta Dutt | Anubhav |
| Mera dil jo mera hota | Geeta Dutt | Anubhav |
| Koi chupke se aake | Geeta Dutt | Anubhav |
| Hasne ki chah ne itna | Manna Dey | Avishkar |
| O maajhi re | Kishore | Khushbu |
| Tere bina zindagi se koi | Kishore & Lata | Andhi |
| Tum aa gaye ho | Kishore & Lata | Andhi |
| Is mod pe aate hain | Kishore & Lata | Andhi |
| Aapki ankhon mein kuchh | Kishore & Lata | Ghar |
| Tumse mila tha pyaar | Kishore & Lata | Khatta Meetha |
| Naam gum jayega | Lata & Bhupinder | Kinaara |
| Ek akela is sheher mein | Bhupinder | Gharonda |
| Humsafar mere humsafar | Mukesh & Lata | Poornima |
| Tumhen zindagi ke ujale | Mukesh | Poornima |
| Aanewala pal jaanewala hai | Kishore | Golmaal |
| Hazaar rahen mudke dekheen | Kishore & Lata | Thodi Si Bewafai |
| Jahaan pe savera ho | Lata | Basera |
| Tujhse naaraaz nahin zindagi | Lata | Maasoom |
| Mera kuchh saamaan | Asha | Ijaazat |
| Yaara seeli seeli | Lata | Lekin |
| Dil hoom hoom kare | Lata | Rudali |
| Aye hawa, mujhko bata | Lata | Maachis |
| Golee maar bheje mein | Mano, chorus | Satya |
| Chal chaiyyan chhaiyaan | Sukhwinder, Sapna | Dil Se |
| Jiya jale | Lata | Dil Se |
| Aye ajnabi, tu bhi kabhi | Udit, Mahalaxmi | Dil Se |
| Tu hawa hai, fiza hai | Sonu Nigam, Alka | Fiza |

हा कवि म्हणतोय की मी सारी बंधनं झुगारून देऊन गीतलेखन केलं. त्यामुळे इतरांना जरी त्यांची कल्पनाशक्ती कधी कधी विचित्र वाटली तरी गुलजारना स्वत:ला त्यात काही वावगं वाटत नाही. उदा. 'हमने देखी है इन ऑखोंकी महकती खूशबू' (लोक म्हणतील, 'ऑखोंकी महकती खूशबू ?') गुलजारचं म्हणणं असं आहे की डोळ्यांची काही आगळीच सुगंधित अशी मोहिनी असते. आणि मग 'लोक गेले उडत, मला फिकिर नाही' असं म्हटल्यासारखंच त्यांनी पुन्हा 'घर' (१९७८) मध्ये 'आप की ऑखोंमे कुछ महके हुए से राज है' (किशोर-लता, संगीत आर. डी. बर्मन) ह्या गाण्यात तसल्याच प्रकारचे शब्द वापरले.

काही गाणी तर प्रशंसेच्याही पलिकडची आहेत. 'तुम्हे पाके हम खुद से दूर हो गये थे, तुम्हे छोड कर अपने पास आगये है.' वाह ! नंतर 'तुम आ गये हो, नूर आ गया है, नही तो चराघोंसे लो जा रही थी. आणि 'हसने की चाह ने इतना मुझे रुलाया है'.

एकाच माणसाकडून एवढं असामान्य काम कसं होऊ शकतं कळत नाही. हे फक्त गुलजारच करू जाणे !

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com